# रंगीत फुगे

: लेखक :

राजा मंगळवेढेकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ९९८ दिनांक .....
विषय. बा.वा. क्र.........

BVBK-0400498

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य एक रुपया

© ज्योत्स्ना प्रकाशन

★

पुनर्मुद्रण : विजयादशमी १२ ऑक्टोबर १९६७
पुनर्मुद्रण : त्रिपुरारी पौर्णिमा, दि. १२–११–१९७०
पुनर्मुद्रण : दि. १५–६–१९७३
पुनर्मुद्रण : दि. १५–१–१९७७

★

मुद्रक : एच. बी. घाणेकर, न्यू एज प्रिं. प्रेस, ८५–पी. बाळू मार्ग, प्रभादेवी, मुं. २५.
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन, ३०–सी, खोताची वाडी, मुंबई ४.

# अनुक्रम

१. रंगीत फुगे

२. नको ग रुसू

३. झोपाळा

४. घोडा आला घोडा

५. गुलाबदादा

६. आई, मी तुझा बाळ कसा !

७. नाटक ! नाटक !

८. लेमनगोळी

९. वानर, वानर हुप् !

१०. कापूसबोंडे पांढरी पांढरी !

११. कुकुचकू

१२. मोरा रे मोरा

१३. उंदीरमामा

१४. गाई, गाई !

१५. झाड हिरवे हिरवे गार

BVBK-0400498




रंगीत फुगे
बघा बघा हे!
चढले वाऱ्यावर
चालले ढगावर

एक छान डोलतो
एक मान मोडतो
एक मागे राहतो
एक पुढे पळतो




चौघेजण मिळून
चालले उंच उडून
पाहा त्यांचा रुबाब
वाऱ्यावरचे नवाब

बघा बघा हे
रंगीत फुगे ! !
रंगीत फुगे ! !
रंगीत फुगे ! ! !



# नको ग रुसू

नको ग बाई रुसू नको
कोपऱ्यात जाऊन बसू नको

अर्धा खेळ टाकू नको
अट्टी गट्टी करू नको

खरंच देईन पेढा गोड
काढायची नाही पुन्हा खोड

खरच शिकवीन गाणं सुंदर
गोष्टही सांगेन परीची नंतर
गोष्टीतली परी किती किती शहाणी
तू पण होशील राजाची राणी
राणीशी खेळायला बाहुली असेल
सांभाळ हो, नाहीतर रुसून बसेल!





# झोपाळा

झू झू झोपाळा
नेऊ चला आभाळा
झोक्यावर बसू
खुदुखुदु हसू
झोका चढे झरझर
वारा येई भरभर
झोका जाई उंच
हाती येई चिंच
गाऊ छान गाणी
बाळ आपण गुणी.

# घोडा आला घोडा

घोडा आला घोडा
त्याला रस्ता तुम्ही सोडा

घोडा आहे शूर
तुम्ही व्हा जरा दूर

घोडा आला दौडत
सारा रस्ता दणाणत

व्हा दूर, व्हा दूर
बघा बघा याचा नूर

★



# गुलाबदादा

गुलाबदादा कळी कशी ?
नाजुक ओठ लाल लाल जशी !

शेवंतीबाई तुझा रंग कसा ?
हळद पिवळी धम्मक जसा !

करदळीताई तुझा झुपका कसा ?
कोंबडेदादाचा तुरा जसा !

बोगनममी तुमची वेणी कशी ?
निळी-जांभळी रिबिन जशी !

# आई, मी तुझा बाळ कसा!

आई मी तुझा बाळ कसा !
गोकुळातला गोपाळ जसा !

आई माझे अंग कसे ?
गोरे गोरे फूल जसे !

आई, माझा पापा कसा ?
गोड, गोड बत्तासा जसा !






अटक मटक बंद करा फाटक
चला खेळूया नाटक! नाटक

ओरडू नका रे येईल आजी!
करील कानांची लाल लाल भजी!

आजोबा देतील खोकत रट्टा
खेळाचा होईल चट्टा मट्टा!

★

# लेमनगोळी

एक होती लेमनगोळी
तिला आली फिरायची लहर

उकडत होते आधीच फार
तशात आली पावसाची सर

लेमनगोळी झाली चिंब
काकडून गेली थंडीने पार

म्हणून गेली चुलीच्या शेजारी
शेकायला अंग गार गार ?

आधीच भिजली, त्यांत शेकले
झाली चिकट, गेली पघळून

सुलूने येऊन मटकावताच
टाळूला बसली चिकटून !



# वानर वानर हुप!

वानर वानर हुप्
तुझ्या शेंडीला शेरभर तूप !

वानर चढले झाडावर
मुले जमली पारावर

टांग मारली घरावर
मुले आली रस्त्यावर

उड्या मारी टण् टण्
छप्पर वाजे दण् दण्

तोंड काळे काळे कुट्ट
लांबच लांब हाले शेपूट

वानर दावी वाकुल्या
मुलांना होती गुदगुल्या !

वानर वानर हुऽप्
तुझ्या शेंडीला शेरभर तूप !





# कापुसबोंडे पांढरी पांढरी

कापुसबोंड पांढरी पांढरी
वेचुन आणली ओटीत सारी

कापुस पिंजुन निर्मळ होतो
सुंदर हलका पेळू बनतो

चरखा फिरतो गरगर
सूत निघते भरभर

सूत मोठे पीळदार
कापड विणते दमदार

कापडाचा शिवला सदरा
आनंदाचा आला दसरा !

# कुकुचकू

कुकुचकू आरवतो कोंबडा
तुरा हालवतो तांबडा तांबडा

कक् कक् करतो
दाणे टिपतो

झुंज खेळतो
पिसे फुलवितो

रुबाब याचा बडा बडा !
डौलात चालतो

निरखून पाहतो
लवकर उठतो

बाग देतो
कुकुचकूचा आरडा ओरडा !

# मोरा रे मोरा



१

मोरा रे मोरा चाललास कुठे
काळे, काळे, ढग राहतात तिथे

२

काळे काळे ढग तर डोंगरावर
तू कसा चढणार त्याच्यावर

३

पिसारा उघडून जाईन की थेट
डोंगरावर होईल ढगांशी भेट

४


पिसारा रंगीत नाजूक किती
डोंगराच्या उन्हाने सुकायची भिती

५

मग काय करू. कसे भेटतील ढग
किती काळे काळे आले वर बघ

६

नाच रे नाच मोरा अशाच वेळी
ढगच उतरून येतील खाली !



# उंदीरमामा



१

उंदीरमामांनी केला एक बेत
घ्यायचे ठरवले गव्हाचे शेत

२

गव्हाच्या शेताला किंमत फार
मामांनी पळवला राणीचा हार

३

राणीच्या हाराला दहा हिरे
मामाजी म्हणाले सहाच पुरे

उरलेल्या चारांतून घेऊ [redacted]
घेऊ गाडी, आणि मुंडाशाला जर

५

मामा निघाले मोठ्या खुशीत
राणीची मनी आली मिशा पुशीत

६

मनीला पाहुन उडाली घाबरगुंडी
हार टाकुन पळाले बिळाच्या तोंडी !

दिनांक
विषय
क्र.
BVBK-0400



# गाई, गाई!

गाई गाई, दूध दे!
दूध दिल वासराला
वासरा वासरा बळ दे
बळ दिल नांगराला
नांगरा नांगरा फाळ दे
फाळ दिला जमिनीला
जमिनी जमिनी कस दे
कस दिला कणसाला
कणसा कणसा धान्य दे
पसा पसा भरून घे!